मा. न्यायालयाकडून प्राप्त होणारे समन्स /वॉरंट्स यांची वेळेवर अंमलबजावणी होण्यासंदर्भात.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः सीआरटी १११४/प्र.क्र. ४३०/पोल-१२
हुतात्मा राजगुरु चौक, मदाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
तारीख: १७ फेब्रुवारी, २०१८

<u>वाचा -</u>

१) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे स्थायी आदेश क्र. ८७.
२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे स्थायी आदेश क्र. १३२, दि. २१ मे, १९६५.
३) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे परिपत्रक क्र. ३१, दि. १६ जून, २०१२.
४) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे परिपत्रक दि. ३ मे, २०१६.

परिपत्रक-

फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या प्रकरण ६ मध्ये कलम ६१ ते ६९ अन्वये समन्स बजावण्यासंदर्भात व कलम ७० ते ८१ अन्वये वॉरंट्स बजावण्यासंदर्भातील कार्यपध्दती विहिती करण्यात आली आहे. तसेच, वरील वाचा येथील स्थायी आदेशान्वये व परिपत्रकान्वये समन्स व वॉरंट्स बजावण्यासंदर्भात मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. समन्स व वॉरंट्स बजावणीची कार्यवाही ही न्यायीक प्रक्रियेमधील अत्यंत महत्वाची बाब असून त्याची अंमलबजावणी विहित वेळेत व कार्यपध्दतीनुसार, तसेच, कालबध्द रितीने झाल्यास न्यायदान प्रक्रियेमध्ये गती येणे शक्य होते व न्यायालयीन खटले दिर्घकाळ प्रलंबित राहत नाहीत.

सबब, समन्स व वॉरंट्स बजावणीच्या कार्यवाहीसंदर्भात शासन/पोलीस महासंचालक/ पोलीस आयुक्त (मुंबई) यांचे स्तरावर उपरोक्त वाचा येथील स्थायी आदेश/ परिपत्रकान्वये तपशीलवार सुचना यापूर्वीच देण्यात आलेल्या आहेत. सदर सुचनांच्या अनुषंगाने सर्व पोलीस आयुक्त/ पोलीस अधीक्षक यांनी त्यांच्या घटकात प्राप्त होणाऱ्या समन्स व वॉरंट्सच्या बजावणीच्या संदर्भात विहित कालावधीत कार्यवाही करावी.

१) मा. न्यायालयातून समन्स/ वॉरंट्स प्राप्त झाल्यानंतर ते कोणत्या न्यायालयाकडून प्राप्त झाले आहे, याबाबतची नोंद, समन्स व वॉरंट्स करीता असलेल्या स्वतंत्र नोंदवहीत घेण्याबाबत यापूर्वीच उपरोक्त वाचा येथील दि.३ मे २०१६ च्या परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या निर्देशांचे सर्व संबंधित पोलीत घटकांनी पालन करावे. तसेच प्रत्येक महिन्यात प्राप्त होणाऱ्या समन्स व वॉरंट्सची पडताळणी न्यायालयीन यंत्रणेशी योग्य तो समन्वय ठेवून करण्याबाबत दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावे. .

२) पोलीस आयुक्तालयाच्या ठिकाणी असलेल्या गुन्हे शाखेमध्ये (Crime Branch) व जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या स्थानिक गुन्हे शाखेमध्ये (LCB) कार्यरत असलेल्या पोलीस निरिक्षक/ सहायक पोलीस निरिक्षक दर्जाचा अधिकारी समन्वय अधिकारी (नोडल ऑफीसर) म्हणून नेमण्याबाबत यापूर्वीच देण्यात आलेल्या सूचनांच्या अनुषंगाने समन्वय अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. समन्वय अधिकारी व त्याच्या अधिपत्याखालील कर्मचारी वर्ग हा प्रोसेस सर्वींग सेल (Process Serving Cell) म्हणून काम पहात आहे. सदरहू समन्वय अधिकाऱ्यांनी समन्स व वॉरंट्स बजावणीसंदर्भातील सोपविण्यात आलेल्या कार्यवाहीची जबाबदारी विनाविलंब पार पाडावी.

३) मा. न्यायालयाकडून प्राप्त होणारे समन्स व वॉरंट्सची बजावणी तात्काळ व कालबध्द स्वरुपात करण्यात यावी.

४) समन्स व वॉरंट्सच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक पोलीस ठाण्यात एक स्वतंत्र विशेष पोलीस पथकाच्या स्थापनेबाबत उपरोक्त वाचा येथील स्थायी आदेशान्वये सुचना देण्यात आलेल्या आहेत. सदर पथकाकडून समन्स व वॉरंट्स बजावणीची कार्यवाही विहित कालावधीत व कालबध्द स्वरुपात होत आहे किंवा कसे याकडे विशेषत्वाने पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी/ वरिष्ठ पोलीस निरिक्षक यांनी लक्ष द्यावे व प्रत्येक आठवड्यात शक्यतो सोमवारी आढावा घ्यावा. समन्स/ वॉरंटच्या अंमलबजावणी संदर्भात पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी/ वरिष्ठ पोलीस निरिक्षक यांनी प्रत्येक महिन्याच्या एक तारखेला त्यांचा मासिक अहवाल सहायक पोलीस आयुक्त/ पोलीस उप अधीक्षक यांना सादर करावा. सहायक पोलीस आयुक्त/ पोलीस उप अधीक्षक यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व पोलीस ठाण्यांचा एकत्रित अहवाल पोलीस उपायुक्त/ पोलीस अधीक्षक यांना सादर करतील. तसेच, पोलीस उपायुक्त/ पोलीस अधीक्षक त्या बाबतचा अहवाल अपर पोलीस आयुक्त/ आयुक्त/ परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरिक्षक यांना सादर करतील.

५) पोलीस उपायुक्त/ पोलीस अधीक्षक यांनी त्यांच्या पोलीस ठाण्याच्या भेटीवेळी समन्स/ वॉरंट नोंदवहीचे निरिक्षण करावे व यामधील त्रुटींचे निवारण करुन संबंधीत अधिकारी/ अंमलदार यांना योग्य मार्गदर्शन/ करण्याबाबत पोलीस महासंचालक यांच्या दि.३ मे २०१६ च्या परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सुचनांचे काटेकोर पालन करावे.

६) सर्व पोलीस घटक प्रमुख यांनी त्यांच्या मासिक गुन्हे बैठकी वेळी (Crime Meeting) समन्स/ वॉरंट्स बजावणीचा आढावा घ्यावा व ज्या पोलीस ठाण्यामध्ये अंमलबजावणी विहित कालावधीत होत नसल्यास त्याच्या कारणांचा शोध घेवून उचित कार्यवाही वेळोवेळी करण्याची दक्षता घ्यावी.

७) समन्स व वॉरंटच्या बजावणीसंदर्भात पोलीस आयुक्तालयात सह पोलीस आयुक्त/ पोलीस उपायुक्त यांनी व जिल्ह्यामध्ये पोलीस अधीक्षक यांनी आवश्यकतेनुसार संबंधीत मा. न्यायाधीश यांच्या समवेत बैठक घ्यावी व यामध्ये प्रलंबित समन्स/ वॉरंट्सबाबत आढावा घेण्यात यावा व पुढील योग्य ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

८) प्रलंबित समन्स व वॉरंटच्या बजावणीची संख्या लक्षणीय, मोठ्या प्रमाणावर असल्यास त्याचा निपटारा करण्यासाठी पोलीस घटक प्रमुख यांनी वेळोवेळी विशेष मोहीम राबवावी व समन्स व वॉरंट्स प्रलंबित राहणार नाहीत याकडे विशेषत्वाने लक्ष द्यावे.

९) समन्स व वॉरंटच्या अंमलबजावणीचे राज्यस्तरावरुन संनियंत्रणासाठी पोलीस उप महानिरिक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांच्यावर तर बृहन्मुंबई आयुक्तालय संदर्भात संनियंत्रणाची जबाबदारी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), बृहन्मुंबई यांच्यावर यापुर्वीच सोपविण्यात आली असून याबाबत त्यांचा तिमाही अहवाल अनुक्रमे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांना सादर करणे सदर संनियंत्रण अधिकारी यांच्यावर बंधनकारक आहे.

१०) सदर परिपत्रकान्वये सोपविण्यात आलेल्या जबाबदारीमध्ये कोणत्याही स्तरावरील अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष केले असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत अधिकाऱ्याविरुध्द योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०२१७१५०१५८२२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Yuvraj B Ajetrao

Digitally signed by Yuvraj B Ajetrao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=68e6425b3accbc2689913c8cbb128d17b6b5411a5b0ad04137df39fe6ab84da7, cn=Yuvraj B Ajetrao
Date: 2018.02.17 15:02:36 +05'30'

(युवराज. ब. अजेटराव)
उपसचिव, गृह विभाग

प्रत,

१. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.

४. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

५. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.

६. अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे.

७. सर्व परिक्षेत्रीय पोलीस महानिरिक्षक.

८. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय, मुंबई.

९. पोलीस उप महानिरिक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१०. सर्व पोलीस आयुक्त.

११. सर्व पोलीस अधीक्षक.

१२. सर्व सह सचिव/ उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

१३. सर्व कार्यासने, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

१४. निवडनस्ती, कार्यासन (पोल १२).